**नि.दि.दा क्र. २३/२०२१**
**छाया .वि. आनंदराव**
**नि.क्र. २० खाली.**

**<u>प्रतीवादी तर्फे वादी (साक्षीदार क्र. १) यांचा शपथेवर उलटतपास ॲड. डी.पी. तुळसकर वकील साहेब यांच्यामार्फत:</u>**

**१३.** माझे शिक्षण बि.ए. फायनल पर्यंत झालेले आहे. मी उच्चशिक्षीत आहे. मी लेखी दस्ताऐवज समजून घेण्यास सक्षम आहे. मी नागपूर येथे कायमनिवासी आहे. माझे पती बँकेत नोकरीवर होते. मी गृहीणी म्हणुन काम करते. शेती हा माझा व्यवसाय नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६/०६/२००६ ला मी गट क्र. १५६/१ विकत घेतला होता. त्याचा रजिस्ट्री क्रमांक मला आठवत नाही.

**१४.** गट क्र. १५६/१ चा कब्जा मला विकत घेतलेल्या वर्षीच मिळालेला होता. हे मला माहीत नाही की, सदर गट क्र. १५६/१ चा कब्जा विकत देणाऱ्याने अधिकृत मोजमाप करून दिलेला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, विकत देणाऱ्याला मी सदर गटाचे कायदेशीर मोजमाप करून विकत देण्यास सांगीतले होते. हे मला माहीत नाही की, सदर मोजमापाची 'क' प्रत मी दाव्यासोबत जोडली आहे किंवा नाही.

**१५.** हे मला माहीत नाही की, गट क्र. १५६/१ हा विकत देणाऱ्याने कोणत्या अधिकाराने प्राप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर गट क्र. १५६/१ विकत घेतेवेळी मी विकत देणाऱ्याची रजीस्ट्री बघीतली होती. सदर रजीस्ट्रीचा क्रमांक मला माहीत नाही.

**१६.** हे मला माहीत नाही की, विकत देणाऱ्याकडे गट क्र. १५६/१ मधील १.८२ हेक्टर आर एवढी जमीन शिल्लक होती किंवा कशी.

**प्रश्न –** तुम्ही जेव्हा शेतजमीन विकत घेतली तेव्हा विकत देणाऱ्याकडे १.८२ हेक्टर आर एवढी जमीन शिल्लक होती ?

**उत्तर –** मला एवढेच माहीत आहे की मी ५ एकर जमीन विकत घेतली होती. त्यांच्याकडे किती जमीन शिल्लक होती हे मला माहीत नव्हते.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या रजीस्ट्रीमध्ये मोजमापाचा एकक हा एकर (Acre) मध्ये नाही. गट क्र. १५६/१ ची चतुसिमा मला सांगता येणार नाही. हे मला माहीत नाही की, गट क्र. १५६/१ च्या चतुसिमेत प्रतीवादी आनंदराव जांभुळे यांचा उल्लेख आहे किंवा नाही.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गटाच्या रजीस्ट्रीवर न वाचता सही केली.

**१९.** आता मला नि.क्र. २७ वर असलेल्या दस्तऐवजामधील पान क्र. ४ वर नमुद असलेली चतुसिमा दाखवीण्यात आली. त्यावर नमुद असलेल्या चतुसिमेमध्ये प्रतीवादी आनंदराव जांभुळे यांचे नाव नाही.

**२०.** आता मला नि.क्र. २७ वर असलेल्या दस्तऐवजामधील पान क्र. ७ दाखवीण्यात आला. त्यावर साक्षीदारांच्या नावांचा उल्लेख नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की त्यावर साक्षीदारांच्या सह्या आहेत. हे मी सांगू शकत नाही की, सदर सह्या कोणत्या साक्षीदारांच्या आहे.

**२१.** हे मला सांगता येणार नाही की, गट क्र. १५६/१ चे रूपांतर गट क्र. १५६ मध्ये करण्याकरीता शासनाचे आदेश प्राप्त केले होते किंवा नाही. हे मला सांगता येणार नाही की, मी दाखल केलेल्या सदर दाव्यात वाद मालमत्ता कोणती आहे.

**२२.** गट क्र. १५६/१ चे मोजमाप मी सर्वप्रथम वर्ष २०११ मध्ये केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजमापाची सुचना प्रतीवादीला देण्यात आली होती. सदर मोजणीला हजर राहण्याचे सुचनापत्र मी दाव्यात जोडले नाही. हे मला माहीत नाही की, मोजणीच्या वेळेस प्रतीवादी हजर होते किंवा नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, त्यावेळेस त्या प्रतीवादीला ओळखत नव्हत्या.

**२३.** आता मला दाव्यासोबत जोडलेल्या नकाशाची प्रत दाखवीण्यात आली. त्यावर मोजणीच्या वेळेस हजर असल्याबाबत प्रतीवादीचे नाव नाही.

**२४.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतीवादी मी पाठवीलेल्या नोटीसीला बांधील नाही. हे मला माहीत नाही की, मी पाठवीलेला नोटीस प्रतीवादीला मिळाला किंवा नाही.

**२५.** आता मला नि.क्र. ३० वर असलेली नोटीसीची पोचपावती दाखवीण्यात आली. त्यावर नोटीस स्वीकारकर्ता म्हणुन मुकरंद जांभुले यांचे नाव आहे.

**२६.** आता मला नि.क्र. २८ वर असलेल्या गट क्र. १५६ चा ७/१२ उतारा दाखवीण्यात आला. तो मी कोणत्या तारखेला प्राप्त केला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर ७/१२ उतारा २८/१०/२०२० रोजी तयार करण्यात आलेला आहे. सदर ७/१२ उताऱ्यावर २०२१ ते २०२२ पुर्वी पिक घेतल्याची नोंद नाही.

**२७.** हे मला माहीत नाही की, गट क्र. १५७ मध्ये प्रतीवादीचा संबंध आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतीवादी विरूध्द मोघम दावा दाखल केलेला आहे.

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतीवादीने दाखल केलेल्या प्रतीदाव्यास नुकसानभरपाई देण्याकरीता मी जबाबदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतीवादी विरूध्द खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटा हलफनामा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयासमक्ष खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>फेरतपास – काही नाही</u>**.

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| (व्ही. आर. फरकूंडे) | (व्ही. आर. फरकूंडे) |
| सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पवनी. | सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पवनी. |
| ०१/०३/२०२५ | ०१/०३/२०२५ |